नि.फौ.ख.क्र. १२०/२०२३
सरकार वि. संजय वगैरे
निशाणी ४२

<u>दिनांकः– २५/११/२०२५</u>

<u>शपथेवर अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांचा उलटतपास आरोपीतर्फे – श्री. एम.एम.पाटील, विद्यमान वकील यांच्यामार्फत सुरु</u>

०७. संजय आणि विजय हे नोकरीनिमित्त कोठे आहेत या संदर्भात मागील तारखेपासून आजपर्यंत मी चौकशी केलेली नाही. हे मला माहित नाही की, संजय आणि विजयची मुले शेटफळे किंवा आटपाडी मध्ये शाळेला नाहीत किंवा कसे. असे म्हणणे योग्य होईल की, आरोपीच्या कुटूंबाची वैयक्तिक माहिती मला नाही.

०८. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराच्या समोरून पुर्व–पश्चिम चालीचा सिमेंट कॉक्रीट रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, तसाच पुर्व–पश्चिम चालीचा रस्ता माझ्या घराच्या पाठीमागेदेखील आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराच्या समोर रवि कोळीचे सराफी दुकान आहे. हे मला माहित नाही की, रवि कोळीने त्याच्या दुकानात सिसिटीव्ही कॅमेरे बसवले आहेत किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, माझे आणि आरोपीचे घर हे एकमेकाला लागून नाहीत. गणपत यशवंत गायकवाड यांचे घर मध्ये आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या घराच्या जवळ दगडू, शशिकांत, राघू, गुलाब, वसंत गायकवाड यांची घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आमचा आणि तात्या व्यंकूचा वाडा यांच्यामध्ये दुसरे कोणाचे राहते घर येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, तात्या व्यंकूच्या वाड्यात लोक राहण्यास आहेत. साक्षीदार सांगतात की, थोडी लोक राहतात. तात्या व्यंकूच्या वाड्यात विठ्ठल गायकवाड, मारुती गायकवाड हे दोघेच राहतात.

०९. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराच्या समोर आणि रवि कोळीच्या दुकानाच्या आसपास राहती घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, रवि कोळीच्या दुकानाच्या दोन्ही बाजूला घरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, भारत पाटील, शहाजी पाटील यांची घरे माझ्या घरापासून लांब आहेत. साक्षीदार सांगतात की, १०० फूट अंतरावर आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दगडू, शशिकांत, राघू, गुलाब, वसंत गायकवाड, तात्या व्यंकूचा वाडा आणि कोळीच्या आसपास असणारी घरे यांच्या तुलनेमध्ये भारत पाटील आणि शहाजी पाटील यांची घरे लांब आहेत. हे म्हणणे खरे

आहे की,माझ्या घरासमोरुन गेलेल्या पुर्व–पश्चिम चालीच्या रस्त्याला लागून भारत पाटील, शहाजी पाटील यांचे घर नाहीत.

**१०.** हे म्हणणे खरे आहे की, आरोपी रामराव वयस्कर आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी रामराव काठी टेकत चालतात. हे म्हणणे खरे नाही की आरोपी क्र. २ आणि ५ हे तथाकथित घटनेवेळी मुंबई येथे नोकरीस होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या जबाबात ''संजय रामराव गायकवाड याने त्याच्या हातातील कु–हाडीने माझे डोक्यात उजव्या बाजूला मारुन मला जखमी केले'' असे नमूद केले आहे.

**११.** हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या कुटूंबाच्या विरोधात यापूर्वी देखील मी फौजदारी केस दाखल केलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्या केसमध्ये मी जबाब दिलेला होता. हे मला माहित नाही की, त्या प्रकरणामधून आरोपींची निर्दोष मुक्तता झाली आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळेस या आरोपीने सुध्दा आमच्याविरुध्द फौजदारी केस दाखल केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या केसमध्ये आटपाडी न्यायालयाने आम्हाला शिक्षा सुनावली होती.

**१२.** हे म्हणणे खरे नाही की, आरोपी संगनमताने एकत्र आमच्या घरात आले व आम्हाला शिवीगाळ करुन, काठी, कु–हाडीने मारहाण केली, धमकी दिली असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ व ५ हे तथाकथित घटनेच्यावेळी होते हे देखील खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमचे व आरोपीच्या कुटूंबामध्ये जमिनीबाबत वाद असल्यामुळे आणि पूर्वी झालेल्या फौजदारी प्रकरणांमुळे बोलचाल बंद आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमचे व आरोपीच्या कुटूंबामध्ये जमिन एकत्रीकरणाच्या वादापासून आजअखेर आमचे व आरोपींचे एकमेकांच्या घरी येणे–जाणे बंद आहे. साधारण १२ वर्षापासून एकत्रीकरणाचा वाद हा आमच्यात व आरोपीच्या कुटूंबात सुरू आहे.

**१३.** हे म्हणणे खरे आहे की, धोंडीरामचा मेहूणा हा पोलीस खात्यात नोकरीस आहे. हे मला माहित नाही की, त्याने आटपाडी पोलीस ठाण्यात नोकरी केली आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, लॉकडाऊनच्या काळात बंदोबस्त असल्यामुळे

आमच्या पाहुण्यांची नेमणूक आटपाडी पोलीस ठाण्यात केली होती. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०६/०६/२०२१ रोजी सायंकाळी ५.०० वाजता भावासोबत घडलेल्या घटनेच्यावेळी मी समक्ष हजर नव्हतो.

**१४.** मी पोलीसांना बयाण देताना असे सांगितले होते की,''रामराव व मनिषा गायकवाड यांनी या रानात यायचे नाही असे म्हणाले होते''. सदर बाब पोलीसांनी रात्रीची वेळ असल्यामुळे लिहून घेतली नसावी म्हणून नमूद नाही. माझे पोलीसांशी वैर नाही.

**१५.** हे म्हणणे खरे आहे की, शेटफळ गावात खाजगी दवाखाने आहेत. हे म्हणणे खरे आहे की, कोळयाला आणि करगणीला खाजगी आणि सरकारी दवाखाने आहेत. करगणी येथे पोलीस आऊटपोस्ट आहे. हे म्हणणे खरे आहे की, आटपाडीच्या तुलनेत कोळा आणि करगणी शेटफळ येथील लोकांना जवळ आहेत. असे घडले नाही की, आम्ही कोळा, शेटफळे किंवा करगणी येथील खाजगी किंवा सरकारी दवाखान्यात उपचार घेतले होते. आमच्या गावात पोलीस पाटील, तंटा मुक्ती समिती आहेत. असे घडले नाही की,मळ्यात झालेल्या घटनेबाबत मी किंवा माझा भाऊ पोलीस पाटील किंवा तंटा मुक्ती समिती कडे गेलो होतो आणि त्यांना घटना सांगितली होती. करगणी आऊटपोस्ट किंवा आटपाडी पोलीस ठाणे येथे प्रत्यक्ष अथवा फोनद्वारे पहिलया घटनेबाबत मी किंवा माझ्या भावाने सांगितले नव्हते. असे घडले नाही की, तथाकथित घटनेबाबत मी किंवा माझ्या भावाने करगणी आऊटपोस्ट येथे जावून तक्रार दिली होती.

**१६.** हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०६/०६/२०२१ रोजी मी आणि माझा भाऊ आरोपींच्या घरात घुसला आणि त्यांना मारहाण केली, त्या झटापटीत आम्हाला झालेल्या जखमांचा गैरफायदा घेवून आरोपींविरुध्द प्रस्तुतची खोटी फिर्याद दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, संजयने कु–हाडीने माझ्या डोक्यात मारहाण केली आणि विजयने काठीने डोक्यावर व नाकावर मारहाण केली असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, विजयने माझ्या वडीलांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मनिषा आणि वैशालीने माझ्या आई व

**नि.फौ.ख.क्र. १२०/२०२३**
**सरकार वि. संजय वगैरे**
**निशाणी ४२**

भावजयला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपींनी घरात घुसून मारहाण केली आणि भारत पाटील वगैरे येवून सोडवा सोडव केली असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दवाखान्यातून खोटे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत करुन खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,
समक्ष

RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2025.11.25 14:53:24 +0530

दि. २५/११/२०२५
आटपाडी.

( आर. बी. कुलकर्णी )
सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी